नायब तहसिलदार संवर्गातील
अधिका-यांना पदस्थापना देण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
क्रमांक:- R&FD-15064(64)/2/2025-MRF(DESKE9)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १५ सप्टेंबर, २०२५

**वाचा:-**

१. शासन आदेश, महसूल व वन विभाग क्र.निलंब-२०२४/प्र.क्र.२१५/ई-९, दि.१५.०१.२०२५
२. समक्रमाकांचा शासन आदेश दि.२०.०६.२०२५
३. जिल्हाधिकारी, बीड यांच्या कार्यालयाचे पत्र दि.२९.०७.२०२५
४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक निप्रआ-११२२/ प्र.क्र.०९/विचौ-२, दि.२२.०४.२०२५

**शासन आदेश-**

श्री.अमोल नरूटे, तत्का. नायब तहसिलदार (निवडणुक), तहसिल कार्यालय पाटोदा, जि. बीड हे निवडणूकी सारख्या अत्यंत महत्वाच्या कालावधीत विनापरवानगी अनधिकृतरित्या गैरहजर राहील्याने त्यांना संदर्भाधीन क्र.१ येथील आदेशान्वये दि.१५.०१.२०२५ पासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आले होते. सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने संदर्भाधीन क्र.२ येथील आदेशान्वये श्री. नरूटे यांचे निलंबन संपुष्टात आणून त्यांना, त्यांना वैद्यकीय तपासणी अहवालाच्या अधिन राहून "ठपका" ठेवून शासनसेवेत पुन:स्थापित करण्यात आले आहे. सदर आदेशानुसार श्री.नरूटे यांच्या सेवा जिल्हाधिकारी कार्यालय, बीड या कार्यालयाशी संलग्न करून त्यांचा वैद्यकीय तपासणी अहवाल शासनास सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांना आदेशीत करण्यात आले आहे तसेच त्यांच्या पदस्थापनेचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील असे देखील नमूद करण्यात आले आहे.

२. आता, उक्त संदर्भाधीन क्र.२ येथील आदेशाच्या अनुषंगाने संदर्भीय पत्र क्र.३ अन्वये जिल्हाधिकारी, बीड यांनी श्री.नरूटे यांचा वैद्यकीय तपासणी अहवाल शासनास सादर केला आहे. त्यानुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयामधील मार्गदर्शक सूचनांनुसार श्री.अमोल नरूटे, तत्का. नायब तहसिलदार (निवडणुक), तहसिल कार्यालय पाटोदा, जि. बीड यांना त्यांचा मूळ जिल्हा व ज्या जिल्ह्यात कार्यरत असताना निलंबित केले तो जिल्हा वगळून **नायब तहसिलदार (संगायो), तहसिल कार्यालय भूम, जि.धाराशीव** या पदावर पदस्थापना देण्यात येत आहे.

३. श्री.अमोल नरूटे यांनी तात्काळ सदर पदावर रूजू व्हावे. संबंधित अधिकारी नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी deske९-rfd@mah.gov.in या ई-मेलद्वारे/टपालाद्वारे शासनास त्वरित कळवावे.

४. संबंधित अधिकारी हे महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयत्तेर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ च्या नियम १५ अन्वये विहित

केलेल्या उक्त तरतुदीनुसार, पदग्रहण अवधी समाप्त होण्यापुर्वी बदलीच्या ठिकाणी रुजू झाले नसल्याचे निदर्शनास आल्यास, त्यांचेविरुद्ध **शिस्तभंगविषयक कारवाई** करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

५. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियमांनुसार दिलेल्या विहित कालावधीत संबंधित अधिकारी यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी रूजू होण्याची दक्षता घ्यावी. अन्यथा या पदस्थापनेच्या पदावर रूजू न झाल्यास, त्यांच्या **अनुपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन** (dies non) **म्हणून गणला जाईल**, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

६. संबंधित अधिकाऱ्यास शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम - ३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने सदर अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्वीकारू नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास ते सदर अधिकाऱ्याच्या मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत.

७. उपरोक्त आदेश सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने निर्गमीत करण्यात येत असल्याने पदस्थापनेच्या ठिकाणी परिविक्षाधीन तहसीलदार वा अन्य अधिकाऱ्यांना विभागीय आयुक्त यांच्या स्तरावरुन तात्पुरते व्यवस्थेने पदस्थापना दिलेली असल्यास अशा अधिकाऱ्यांना विभागीय आयुक्त यांनी अन्य रिक्त पदावर पदस्थापना द्यावी.

८. सदरहू आदेशानुसार तात्काळ पदस्थापनेच्या पदावर रूजू न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून पदस्थापना रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे, ही गैरवर्तणूक समजून त्यांचे विरूद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

९. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२५०८०६१८१७३५५३१९ असा आहे. हे शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHRIKANT MADHUKAR MOHITE

Digitally signed by SHRIKANT MADHUKAR MOHITE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=5b514d2c3257bba976c5a2de42be8a635bba691c05d1f65ed0ead155a190e90e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5F152866E6FC64E39CF88B9CB27AE0169A65B000039B269233C42B5B77F06B31, cn=SHRIKANT MADHUKAR MOHITE
Date: 2025.09.15 15:22:18 +05'30'

**(श्रीकांत म. मोहिते)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

श्री.अमोल नरूटे, तत्का. नायब तहसिलदार (निवडणुक), तहसिल कार्यालय पाटोदा, जि. बीड
(विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत)

**प्रत:-**

१) विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.
२) जिल्हाधिकारी, बीड/धाराशीव.
३) जिल्हा कोषागार अधिकारी, बीड/धाराशीव.
४) निवड नस्ती, आस्था- ९ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.